॥ श्री ॥

॥ बाबा ॥

बाबा शोभती मंदिरी आणि बाहेर आसनावरी
आहेत दोन्ही बाबा एक का व्दैत येते मनी ॥ धृ ॥

बाबा शिंपतात सडे देऊन नामाचे हो धडे
सुगंध त्याचा दरवळे चहूकडे चारी दिशे
विसरू नकोस बाबानामे
जाऊ नकोस तिसरीकडे
घे गोड बाबा नामे
त्यात हित आहे तुझे ॥ 1 ॥

धरून लोभ माया मोह
करुनी जवळ नाश विष
जाण महत्त्व बाबा कर्मे
जे आहे सकर्मक
होशी बाळा नाशिबवान
जाऊनि अनन्य शरण
होईल तुझे सर्व रक्षण
नाही काटा नाही ठेच ॥ 2 ॥

बाबांचे हो तंत्रच न्यारे
जसे पिल्लू मांजरा मुखे
दांडकती पदोपदी
आणि हसून दुस-या क्षणी
जगावेगळी ही गोडी
जगावेगळे हे प्रेम
बाबानाम हेच चुर्ण
आहे जाणण्या सामर्थ्य ॥ 3 ॥

बाबानामे जाऊ दे हो
हेवा, क्रोध, मत्सरपण
लीन होवो माझे मीपण
हेच चरणी वंदन
तुच कर्ता या देहाचा
आणि तूच करविता
आहे तुच माझ्याजवळ
ज्ञात आहे मी जाणून ॥ 4 ॥

★★★★★